# जनसंपर्क अधिकारी

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २६०-२२** **दिनांक २२/०८/२०२२**

## वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची लाखो रुपयांची फसवणुक करणाऱ्या आरोपीतास अटक - माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये फिर्यादी नामे जय पाटील, वय २० वर्षे यांना डिसेंबर २०२१ ते आजपावेतो आरोपीत नामे सुधांशु जगदंबा चौबे, वय ३२ वर्षे याने त्याची मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडिया येथे ओळख असल्याचे सांगुन मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडिया मार्फत श्री. नर्सिंग दुबे चॅरिटेबल ट्रस्ट मेडिकल कॉलेज येथे मेडीकल फिल्डला ॲडमिशन करुन देण्याचे भासवले व त्यांच्याकडुन एकुण रु.११,००,०००/- रक्कम स्विकारुन मेडीकल कॉन्सील ऑफ इंडीयाच्या नावे बनावट ईमेल आयडी तयार केला. फिर्यादी व इतर साक्षीदार यांना ॲडमिशन संदर्भात मेल करुन त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांच्या रकमेचा अपहार करुन त्यांची फसवणुक केली. फिर्यादी यांनी दिनांक १३/०८/२०२२ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपूर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २८३/२०२२ कलम ४२०, ४०६ भा.दं.वि.सं.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासात आरोपीने १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविदयालयामध्ये प्रवेश देण्यासाठी अदयापपर्यत एकुण रु. ६२,१२,८२०/- रक्कमेची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी नामे सुधांशु जगदंबा चौबे, वय ३२ वर्षे, रा. शास्त्री नगर, वर्तक कॉलेज मागे, वसई पश्चिम, जि. पालघर यास दिनांक १३/०८/२०२२ रोजी नमूद गुन्हयात अटक करण्यात आली होती.

आरोपीवर दाखल गुन्हे-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २८३/२०२२ कलम ४२०,४०६ भा.दं.वि.सं. |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २८७/२०२२ कलम ४२०,४०६ भा.दं.वि.सं. |
| ३. | मांडवी पोलीस ठाणे | गु.र.क्र. ९५/२०२२ कलम ४२० भा.दं.वि.सं. |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पो.नि. अभिजीत मडके (गुन्हे), पो.नि. अशोक कांबळे (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, अनिल चव्हाण व पो.शि. प्रविण कांदे यांनी पार पाडलेली आहे.


माणिकपूर पोलिस ठाणे
नवीन सनसिटी पोलिस चौकी